मुंबई विद्यापीठ

स्मरणपत्र –१

प्रकाशन विभाग
प्र.वि/आयसाडी/२०१९–२०/१५
कक्ष क्र. २२१,
मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– ०२ डिसेंबर, २०२०

परिपत्रक :
विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील विभाग प्रमुख आणि संचालक

विषय : विद्यापीठाचे सन २०१९–२० या वर्षाचे वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी (कालावधी : १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२०) माहिती पाठविण्याबाबात.

संदर्भ:– १. परिप्रत्रक क्र.प्र.वि/आयसाडी/२०१९–२०/११ दिनांक १३ नोव्हेंबर, २०२०

महोदय/महोदया,

या कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकानुसार आपणास कळविण्यात येते की, वरील परिपत्रकाद्वारे मागविलेली माहिती आपण अद्याप पाठविलेली नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६– कलम १३६(१) व १३६(२) नुसार विद्यापीठाचा मराठी व इंग्रजी मधील अहवाल विधान मंडळाच्या सभागृहापुढे सादर करावयाचा असल्यामुळे आपल्याकडून आवश्यक असलेली विभागाची माहिती दि. १० डिसेंबर, २०२० पर्यत फक्त ई–मेल द्वारे पाठविण्यात यावी.

दिनांक १० डिसेंबर, २०२० नंतर कोणत्याही माहितीचा वर्षवृत्तामध्ये समावेश केला जाणार नाही व सदर माहिती पाठविण्यास आपण उत्सूक नाही असे समजण्यात येईल व त्याची सर्व जबाबदारी विद्यापीठ विभाग/प्राचार्य व संस्था संबंधितांवर राहिल. याबाबत काळजीपुर्वक नोंद घेण्यात यावी.

हे पत्र अत्यंत तातडीचे समजावे.
(सोबत:– परिप्रत्रक क्र.प्र.वि/आयसाडी/२०१९–२०/११ दिनांक १३ नोव्हेंबर, २०२० चे अवलोकन करावे)

टिप:–

१. माहिती फक्त ई–मेल द्वारे स्वीकारण्यात येईल. त्यासाठीचा ई–मेल आयडी पुढीलप्रमाणे :– **fortpublication@gmail.com**

२. माहिती पाठवितांना मराठी साठी– कृतीदेव ५०/ Unicode, Font size– १८ व इंग्रजीसाठी Times New Roman, Font size– १४ Word File मध्ये पाठवावी.

३. माहिती पाठवितांना त्या– त्या शैक्षणिक वर्षांचा ठळकपणे उल्लेख करण्यात यावा.

४. कृपया माहिती दिनांक १० डिसेंबर, २०२० पर्यंत पाठवावी. (माहिती फक्त ई–मेलद्वारे (word file) स्वीकारण्यात येईल कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी)

५. सदर परिपत्रक (प्र.वि/आयसाडी/२०१९–२०/११ दिनांक १३ नोव्हेंबर, २०२०) मुंबई विद्यापीठाच्या www.mu.ac.in – या संकेतस्थळावरील Circular Link अंतर्गत Publication Section येथे उपलब्ध करून देण्यात आले आहे.

६. वर्षवृत्ताची माहिती महाविद्यालय/विद्यापीठ विभागांचे संचालक व विभाग प्रमुख/मान्यता प्राप्त संस्थाचे प्रमुख यांनी या अगोदर पाठविली असल्यास हे स्मरणपत्र विचारात घेऊ नये.

प्रत माहितीसाठी अग्रेषित:–

मुंबई विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/ विभाग प्रमुख, सर जी. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक जमनालाल बजाज व्यवस्थापन संस्था, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.

डॉ. बळीराम गायकवाड
(प्र. कुलसचिव)

मुंबई ४०० ०३२
०२ डिसेंबर, २०२०.